दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक २२० • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.१० नोव्हेंबर २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com



# अखेर संजय राऊत यांची जेलमधून सुटका

## ईडीच्या कारवाईत असमानता : कोर्टाने झापले

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेनेचे फायरब्रँड नेते संजय राऊत आज अखेर तीन महिन्यांनी जेलमधून बाहेर आले आहेत. पत्राचाळ घोटाळ्यांच्या आरोपाप्रकरणी ईडीने त्यांना गेल्या तीन महिन्यांपूर्वी अटक केली होती. अखेर १०२ दिवस जेलमध्ये मुक्काम केल्यानंतर संजय राऊतांची न्यायालयीन कोठडीतून मुक्तता झालीय. संजय राऊत आणि शिवसेना या दोन्हींसाठी गेले तीन महिने किती खडतर होते याचा संपूर्ण महाराष्ट्र साक्षीदार आहे. संजय राऊतांच्या जामीनामुळे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या गटात नवचैतन्य संचारलं आहे.

पीएमएलए कायद्यांतर्गतच्या प्रकरणांत कायद्याचे रक्षण करण्याचे जसे न्यायालयाचे कर्तव्य आहे, तसेच बेकायदा अटक झालेल्या निष्पाप नागरिक व आरोपींच्या हक्कांचे रक्षण करणेही न्यायालयाचे कर्तव्य आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटल्याप्रमाणे आरोपींच्या मौल्यवान हक्कांबाबत न्यायालय दुर्लक्ष करू शकत नाही. तसे केले तर लोक न्याय मागण्यासाठी कुठे जाणार? या न्यायालयाला लहानशीही चूक करून चालणार नाही. पीएमएलए कायद्यांतर्गत असलेल्या कठोर दुहेरी अटींच्या अनुषंगाने उपलब्ध सर्व पुरावे व कागदपत्रे लक्षात घेऊनच आणि आपल्या कायदेशीर चौकटीत राहूनच हे न्यायालय जामीन मंजुरीचा आदेश देत आहे. दोन्ही आरोपींना बेकायदा अटक करण्यात आले आहे, अशा निष्कर्षापर्यंत हे न्यायालय आले आहे', असेही न्या. देशपांडे यांनी आपल्या १२२ पानी निकालात नमूद केले.

पत्राचाळ घोटाळ्याच्या प्रकरणात म्हाडाच्या भूमिकेबद्दलही संशय व्यक्त करून ईडीने म्हाडाच्या कोणत्याच कर्मचाऱ्याला आरोपी केले नाही. शिवाय कथित घोटाळ्यातील मुख्य आरोपी राकेश व सारंग वाधवान यांना ईडीने अटकच केली नाही. त्यांना मोकाट सोडले... त्याच प्रकरणात स्पष्टपणे दिवाणी वादाचे स्वरुप असूनही त्या प्रकरणाला मनी लॉंड्रिंग प्रकरणाचा शिक्का लावून ईडीने प्रवीण राऊत यांना अटक केली आणि संजय राऊत यांना तर कोणत्याही कारणाविना अटक केल्याचे दिसते, अशी अतिशय गंभीर निरीक्षणे न्यायाधीश एम. जी. देशपांडे यांनी आदेशात नोंदवली.

संजय राऊत यांना आज विशेष पीएमएलए कोर्टाकडून जामीन मिळाल्यानंतर त्यांच्या जामीनाचे कागदपत्रे आणि रिलीज ऑर्डर ऑर्थर रोड कारागृहाबाहेर असलेल्या पेटीत साडेपाच वाजेआधी टाकण्यात आले होते. त्यानंतर साडेपाचला ही पेटी उघडली. नंतर रिलीजची सर्व प्रक्रिया सुरु झाली होती. त्यानंतर दीड-दोन तासांनी संजय राऊतांचे कपडे आणि इतर सामान जेलमाधून बाहेर आणण्यात आलं. ते सामान त्यांच्या गाडीत ठेवण्यात आलं. त्यानंतर थोड्यावेळाने संजय राऊत आर्थर रोड कारागृहाबाहेर आले.

संजय राऊत यांची प्रकृती बरी नसल्याची माहिती समोर येतेय. त्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात येईल, अशी माहिती त्यांचे भाऊ सुनील राऊत यांनी दिली. संजय राऊत यांना आज विशेष पीएमएलए कोर्टाने मोठा दिलासा दिला. कोर्टाने त्यांचा जामीन मंजूर केला. यावेळी ईडीच्या वकिलांनी त्यांच्या जामीनाला विरोध केला. पण कोर्टाने त्यांचा विरोध फेटाळत संजय राऊतांचा जामीन मंजूर केला. संजय राऊत हे लोकप्रतिनिधी

# आजही कामोठ्यातील घरांमध्ये दि.बा.पाटील साहेबांचे फोटो देव्हाऱ्यात आहेत : आ.प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**



कामोठ्याची वस्ती ही सिडकोच्या साडेबारा टक्के विकसित भूखंडावर केली आहे. सिडकोचे फार थोडे टेंडर प्लॉट या ठिकाणी झाले आहेत. सिडकोच्या विकसित भूखंडाचे मालक आज लाखोपती-करोडपती झाले असतील तर त्याची पुण्याई दि. बा. पाटील साहेबांची आहे. दि. बा. पाटील साहेबांच्या आशीर्वादामुळे हे शक्य झाले आहे. त्यामुळेच कामोठ्यातील घराघरात दि. बा. पाटील साहेबांचा फोटो देवघरात पाहायला मिळतात. लोकांच्या गाड्यांवर दि. बा. पाटीलसाहेबांची पुण्याई असे लिहिलेले पाहायला मिळेल कारण त्यांनी आपल्या कर्तृत्वातुन नवी मुंबई भागातील सर्वसामान्य लोकांना न्याय दिला. असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी कामोठे महोत्सवादरम्यान केले.

आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले, दि. बा. पाटील साहेबांचे साडे बारा टक्क्याचे तत्व आता महाराष्ट्रभर पसरले आहे. सिडकोने हे तत्त्व स्वीकारले, मग एम.आय.डी.सी. ने १५% विकसित भूखंड देण्यास सुरुवात केली. या परिसरातील ९५ गावांचे पुनर्वसन सोलापूर भागात होणार होते असे झाले असते तर इथला तरुणवर्ग आज कुठे तरी वेठबिगारी करताना दिसला असता किंवा हॉटेलमध्ये कपबश्या धुण्याची वेळ आली असती. परंतु त्यांना ताठ मानेने जगायला दि. बा. पाटील साहेबांनी शिकवले. म्हणूनच इथली जनता त्यांची ऋणी आहे. त्यांचा सन्मान मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने केला.

कै. बळीराम राघो पावणेकर सार्वजनिक ग्रंथालय आणि वाचनालय, जिल्हा सामाजिक संस्था, यांनी सकाळ ग्रुपच्या माध्यमातून ११व्या वर्षामध्ये कामोठे येथे आगरी कऱ्हाडी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने उपस्थित महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री आणि रायगड आणि रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत, माजी खासदार रामशेठ ठाकूर, मंचावर ज्यांचा सन्मान झाला असेल मान्यवर आणि कामोठे वासिय महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधी म्हणुन कामोठे वसिय आपले आभार मानु इच्छितो. आपण जिथे अभिवादन केले त्या दिवंगत नेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबईच्या विमानतळाला देण्याचा ठराव करण्यात आला त्याबद्दल कामोठेवासिय आभारी आहोत, असेही आ.प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले.

आपले सरकार रोज वेगवेगळे धडाडीचे निर्णय घेत आहे. आणि विविध ठिकाणच्या भूमिपुत्रांना आणि प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्यासाठी काम करत आहे. याचा आम्हाला अभिमान वाटतो. नव्याने होणारे विमानतळ किंवा जेएनपीटी

.../२

# जेएनपीए बंदरात प्राण्यांची कातडी व प्रसिद्ध चित्रकारांची दुर्मिळ चित्रांची तस्करी

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीए बंदरातून तस्करीचे प्रकार उघडकीस येऊ लागले असून, सिमा शुल्क विभागाने केलेल्या तपासणी मोहीमेत कागदोपत्री घरगुती सामानाच्या कंटेनरमधून कोट्यावधी किंमतीची प्राण्यांची कातडी आणि प्रसिद्ध चित्रकारांची दुर्मिळ चित्रे हस्तगत करण्यात आली. तसेच एक दिवसापूर्वी इराणीयन किवी फळांच्या कंटेनरच्या तपासणीत ३ कोटी रुपये किंमतीचे नेकट्राईन फळ आढळले होते.त्यामूळे जेएनपीए बंदर तस्करांच्या विळख्यात सापडले असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

याबाबत मिळालेल्या खात्रीशीर वृत्तनुसार सिमा शुल्क विभागाने गेल्या दोन दिवसात केलेल्या दोन तपासणीमध्ये कोट्यावधीचा तस्करी केलेला माल सापडला.मंगळवारी गुप्त माहिती मिळाल्यानंतर सिमा शुल्क विभागाने कंटेनरची तपासणी केली असता, कागदोपत्री घरगुती वस्तू असल्याची नोंद असतांना प्रत्यक्षात मात्र दुर्मिळ वस्तूंची तस्करी करण्यात येत असल्याची बाब सिमा शुल्क विभागाच्या तपासात समोर आली आहे.

केलेल्या तपासणीत दक्षिण आफ्रिकेतून आलेल्या एका कंटेनरमधून झेब्र्याची कातडी, अत्यंत मौल्यवान आणि दुर्मिळ कलाकृती, लॅरी नॉर्टन, लॅम्बार्टसारख्या जगप्रसिद्ध चित्रकारांची ३८ दुर्मिळ चित्रे, असा करोडो रुपयांचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. तर इराणीयन



किवी फळांच्या १७७ मेट्रिन टनाच्या कंटेनरच्या तपासणीत ३ कोटी रुपये मूल्याचे ३२ मेट्रिक टन नेकट्राईन फळ आढळले. जेएनपीए बंदरात अत्याधुनिक यंत्रणेद्वारे कंटेनर तपासणी होत असतांनाही वारंवार तस्करी केल्याच्या घटना समोर येत आहेत. त्यामूळे यामुळे येथील सुरक्षा यंत्रणेबाबत नागरिकांकडून शंका उपस्थित करण्यात येत आहे.

### अमेटी प्रशासन नरमले; 30 नोव्हेंबर पर्यंतची मुदत

# ...तर अमेटी व्यवस्थापनाला देणार जोरदार दणका ; आ.महेश बालदी यांचा तीव्र आंदोलनाचा इशारा



**दै.रायगड नगरी । पनवेल**

अमेटी युनिव्हर्सिटीमध्ये कामगारांना किमान वेतन देण्याबाबत नोव्हेंबर अखेर पर्यंत निर्णय घेऊ असे प्रशासनाच्यावतीने आमदार महेश बालदी यांना आश्वासित करण्यात आले आहे, मात्र ३० नोव्हेंबर पर्यंत कामगारांचे प्रश्न मार्गी लावा अन्यथा तीव्र आंदोलन करून अमेटी व्यवस्थापनाला धडा शिकवला जाईल, असा इशारा आमदार महेश बालदी यांनी अमेटी व्यवस्थापनाला आज (दि. ०९) दिला. भाताण येथे असलेल्या अमेटी युनिव्हर्सिटीच्या माध्यमातून कामागारांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात भाजपच्यावतीने आमदार महेश बालदी यांच्या नेतृत्वाखाली गेट बंद आंदोलन करण्यात आले.

स्थानिक कर्मचाऱ्यांना योग्य वेतन मिळावे तसेच स्थानिक विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण मिळावे, या मागणीसाठी हे आंदोलन झाले. या आंदोलनात पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक बबन मुकादम, कामगारनेते जितेंद्र घरत, भाजपचे तालुका उपाध्यक्ष प्रवीण खंडागळे, संजय टेंबे, गुळसुंदे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, पोयंजे विभागीय अध्यक्ष प्रवीण ठाकूर, कसलखंड ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अनिल पाटील, सावळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शिवाजी माळी, प्रफुल्ल माळी, भाताण गाव अध्यक्ष चंद्रकांत भोईर, कृष्णा भोईर, भाताण उपसरपंच केशव गायकर, ग्रामपंचायत सदस्य तानाजी पाटील, अनिल भोईर, सुभाष मुकादम, महेंद्र गोजे, गुरुनाथ पाटील, किरण मुकादम, स्वप्नील भोईर, अशोक भोईर, रुपेश भोईर, नितेश पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

यावेळी आमदार महेश बालदी यांनी अमेटी युनिव्हर्सिटीची शाखा महाराष्ट्रात असल्याने किमान वेतन कायद्याप्रमाणे त्यांनी येथील कामगारांना वेतन दिले पाहिजे, असे सांगितले. प्रशासना तर्फे रजिस्टार एस.पी.उपाध्याय व हिरा एस. व्यास यांनी शिष्टमंडळाला सुरूवातीला तीन महिन्यात निर्णय घेऊ असे सांगण्याचा प्रयत्न केला. आमदार महेश बालदी यांनी त्याला विरोध करून

.../२

### नागरिकांचे सक्षमीकरण आणि अधिकाराविषयक माहिती करीता...

# पनवेलमध्ये पनवेल तालुका विधी सेवा समितीच्यावतीने काढण्यात बाईक रॅली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नागरीकांचे सक्षमीकरण आणि अधिकाराविषयक माहिती करीता पनवेल मध्ये पनवेल तालुका विधी सेवा समितीच्यावतीने काढण्यात आलेल्या बाईक रॅलीची सुरुवात पनवेल मधील जिल्हा व सत्र न्यायालय पनवेल, रायगड येथून सुरुवात झाली.

या रॅलीदरम्यान छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. सकल भारत कायदेविषयक जनजागृती अभियाना अंतर्गत पनवेल तालुका विधी सेवा समितीच्यावतीने ३१ ऑक्टोबर ते १३ नोव्हेंबर दरम्यान विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्यापार्श्वभुमीवर समितीच्यावतीने कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाद्वारे नागरीकांचे सक्षमीकरण आणि त्यांच्या अधिकारा विषयक माहिती व्हावी या करीता बुधवारी बाईक रॅली काढून जनजागृती



करण्यात आली. ह्या रॅलीला पनवेल मधील जिल्हा व सत्र न्यायालय पनवेल, रायगड येथून सुरुवात झाली असून संपुर्ण पनवेल परिसरात फिरवण्यात आली. यावेळी जिल्हा न्यायाधिश-१ जे. डी.वडणे, जिल्हा न्यायाधिश, पनवेल आस. एस. भाकरे, न्याय दंडाधिकारी वर्ग १ पनवेल इंदलकर, न्याय दंडाधिकारी वर्ग -१ पांडे, न्याय दंडाधिकारी वर्ग -१ सोनवलकर, न्याय दंडाधिकारी वर्ग -१ वाघमारे तसेच पनवेल वार संघटनेचे अध्यक्ष ॲड.मनोज भुजबळ, वार संघटनेचे सदस्य ॲड.धनराज तोकडे, ॲड.विशाल डोंगरे, ॲड.भुषण पाटील, ॲड.अमर पटवर्धन, ॲडव्होकेट मनोज म्हात्रे, ॲड.विशाल मुंडकर, ॲड.इंद्रजीत भोसले, ॲड.ज्योती उरणकर, ॲड.चंद्रकांत मढवी, ॲड.इरशाद शेख, ॲड.मनोहर सचदेव, आयडे मॅडम यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# मुंबई गोवा महामार्गासाठी मानवी साखळी आंदोलन करीत पत्रकारांनी वेधले शासनाचे लक्ष

## उच्चस्तरीय समिती नेमून चौकशीची केली मागणी ; एक महिन्यात महामार्ग दुरुस्त करण्याचा दिला अलटीमेटम



**दै.रायगड नगरी । रोहा**

चौपदरीकरणाचे काम रखडल्याने आणि दुरावस्था झालेल्या मुंबई गोवा महामार्गाचे काम त्वरित सुरू करण्याच्या मागणीसाठी रायगड जिल्ह्यातील पत्रकारांनी मुंबई गोवा महामार्गावर कोलाड नाका येथे मानवी साखळी आंदोलन करीत सरकारचे लक्ष वेधून घेतले. मराठी पत्रकार परिषदचे मुख्य विश्वस्त, ज्येष्ठ पत्रकार एस एम देशमुख यांच्या नेतृत्वाखालील हे आंदोलन करण्यात आले. मंजुरीनंतर ११ वर्षे रखडलेल्या या महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाची उच्चस्तरीय समिती गठीत करून चौकशी व्हावी आणि दोषी ठेकेदार, अधिकारी व संबंधितांवर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणीही यावेळी करण्यात आली. पत्रकार आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभाग घेतला.

मुंबई गोवा महामार्गावरील वाढते अपघात रोखण्यासाठी यामार्गाचे चौपदरीकरण करण्यात

.../२

# पृथ्वी जपण्याचे आव्हान

इजिप्तमध्ये सुरू झालेली 'कॉप-२७' या नावाची जागतिक हवामान परिषद ही नेहेमीप्रमाणे काही देशांना लक्ष्य करून संपणार आहे की साऱ्या जगासमोर पुढच्या काळासाठी काही ठोस कृती आराखडा ठेवणार आहे, हे आता लवकरच कळेल. ही परिषद प्रदीर्घ असून तीत पर्यावरणाच्या अनेक घटकांवर सविस्तर चर्चा होणार आहे. २७ देशांनी पुढाकार घेतलेल्या या परिषदेत शंभराहून अधिक देश सहभागी होत आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडेन यांच्यासहित अनेक राष्ट्रप्रमुखही तेथे हजेरी लावणार आहेत. मात्र, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे राष्ट्रप्रमुख शी जिनपिंग हे या परिषदेत सहभागी होणार नाहीत. या परिषदेच्या कार्यक्रम आणि हेतूंविषयी काही शंका असल्याने हे दोन महत्त्वाच्या देशांचे नेते तेथे जात नाहीत का, या प्रश्नाचे उत्तरही काही दिवसांनी मिळेल. मात्र, या परिषदेच्या उद्घाटन समारंभात संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनिया गुटेरस यांनी 'चीन आणि भारत यांनी एकत्र येऊन जगाची हानी टाळण्यासाठी काम करावे,' असे आवाहन केले. या दोघांनी एकत्र का यायचे तर त्यांनीच जगाचे सर्वाधिक नुकसान चालविले आहे, असे यातला गर्भितार्थ आहे. तो भारताला कदापि मान्य होण्यासारखा नाही. अशा परिषदांमध्ये जोवर सकल वसुंधरेचा एकत्रित विचार होणार नाही आणि विशेषत: अमेरिका आणि युरोप हे आत्मपरीक्षण करणार नाहीत, तोवर त्यातून ठोस काही निघणार नाही. आज दुसऱ्या आणि तिसऱ्या जगातील अनेक देश हे औद्योगिक उत्पादनांचे आगर बनले असले तरी ही उत्पादने कुठे वापरली जातात, यांचाही ताळा मांडावा लागणार आहे. आज ना उद्या अमेरिकेतील दरडोई ऊर्जाव्यय आणि इंधरवापर यांचाही हिशेब करावा लागणार आहे. भारत आणि चीन हे एकाच व्यासपीठावर येऊन समान किंवा परस्परपूरक भूमिका मांडण्याची शक्यता क्वचितच असते. मात्र, अशा हवामान परिषदा हा याला अपवाद आहे. या परिषदेत प्रथमच 'लॉस अँड डॅमेज' म्हणजे 'तोटा आणि नुकसान' या संकल्पनेवर आधारित गंभीरपणे चर्चा होण्याची शक्यता आहे. यातला तोटा आणि नुकसान हे अर्थातच पर्यावरण आणि जैविक बहुविधतेचे. मात्र, या तोट्याचा आणि नुकसानाचा हिशेब मांडायचाच झाला तर तो औद्योगिक क्रांतीच्या बाळपावलांपासून म्हणजे सन १७६० पासूनच मांडायला हवा. मात्र, ही क्रांती सुमारे शंभर वर्षांत पुरी झाली आणि १८५० ते ६० च्या दरम्यान स्थिरावली. तेव्हापासून म्हणजे, सन १८६० पासूनच्या कर्बोत्सर्जनाचा हिशेब मांडला जावा, अशी आग्रही भूमिका या 'लॉस अँड डॅमेज'मध्ये आहे. याचे एक कारण म्हणजे एकदा निर्माण झालेला कार्बन हा अनेक शतके तसाच राहण्याची क्षमता बाळगून असतो. तेव्हा, पृथ्वीवर आज कोसळलेल्या संकटाची जबाबदारी निश्चित करताना गुटेरस म्हणाले त्याप्रमाणे केवळ आज औद्योगिकीकरण वाढलेल्या देशांना जबाबदार धरता येणार नाही. यातला दुसरा डॅमेजचा मुद्दा हा जगभरात लागू होतो. याचे ताजे उदाहरण म्हणजे पाकिस्तानमध्ये अलीकडे जो भयंकर पाऊस आणि महापूर आले; त्याचे कारण पर्यावरणाचा ढासळता समतोल आहे, हे आता जगात साऱ्यांनी मान्य केले आहे. पाकिस्तानला हा अस्मानीचा जो फटका बसला, त्यात त्याचा काहीच दोष नाही. इतरांनी वर्षानुवर्षे केलेल्या कर्बोत्सर्जनाचा मार निसर्गाने पाकिस्तानला दिला. जगातील अशा नुकसानाचा हिशेब लावण्याचा प्रयत्न या परिषदेत व्हायला हवा. तो विकसनशील व गरीब देशांच्या हिताचा आहे. प्रगत आणि विकसित देश हे भारत व चीन यांना लक्ष्य करताना आपापल्या देशातील जीवनशैली, ऊर्जावापर आणि सर्व प्रकारच्या कचऱ्याची निर्मिती याबाबत ठोस जबाबदारी घेण्याचे टाळत असतात. श्रीमंत देशांनी सन २०३० पर्यंत संपूर्णपणे कोळशाचा वापर बंद करावा आणि इतर देशांनी सन २०४० पर्यंत ते करावे, असे मागे ठरले होते. मात्र, सगळ्या श्रीमंत देशांनी आम्ही दरडोई ऊर्जावापर कमी करून दाखवू, अशी विधायक भूमिका आजवर घेतलेली नाही. श्रीमंत देशांच्या भूतकाळातील आणि आजच्या कार्बन उत्सर्जनाची गरीब देशांना भरपाई द्यायची का आणि ती द्यायची झालीच तर कशी द्यायची, यावरही काही चर्चा या परिषदेत अपेक्षित आहे. भारताच्या दृष्टीने पाहिले तर भारताची विकासाची घोडदौड सुरू व्हायला आणि साऱ्या जगावर हवामान बदलाचे ढग जमायला जवळपास एकच गाठ पडली आहे. त्यामुळे, भारतासमोरचे आव्हान अधिक बिकट झाले आहे. विकास तर करायचा; पण पर्यावरणीय संकटाचीही दखल घ्यायची; असे दुहेरी आव्हान आज भारत पेलतो आहे. भारताने या परिषदेत पर्यावरणप्रेमी जीवनाची संकल्पना साकारणारा शामियाना उभारला आहे. ही पर्यावरणप्रेमी जीवनाची वाट साऱ्या जगाला आपली वाटते का, यावर या परिषदेचे यशापयश अवलंबून आहे. केवळ विकसनशील आणि विकसित देशांनी परस्परांवर आरोप करण्याची वेळ आता निघून गेली आहे.

# मुंबई, नवीमुंबईचा कचरा उरणाच्या रस्त्यावर, रस्ते बनले धोकादायक



**दै.रायगड नगरी । उरण**

मुंबईच्या घातक कचऱ्याचे उरण –पनवेल हद्दीतील सिडकोच्या जागांवर मानव निर्मित डोंगर तयार केल्यानंतर रहदारीच्या रस्त्यावर टाकला जात आहे. असाच कचरा आत्ता थेट कचरा गव्हाण फाटा –दिघोडे रस्त्यावरच टाकला जात असल्याने रस्ता धोकादायक बनला असून प्रवाशांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

मुंबई, नवीमुंबई शहरातील कचऱ्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी कचरा माफीये गेली पाच वर्षे उरण परिसरात सर्किट झाले असून सदर शहरातील कचरा (डेब्रिज) हा उरण, उलवे पनवेल च्या सिडको हद्दीत टाकून लाखों रुपये हे सिडको, महसूल, पोलीस यंत्रणेला हाताशी धरून कमवित आहेत. त्यामुळे जासई, वहाळ, गव्हाण ग्रामपंचायत हद्दीत कचऱ्याचे ( डेब्रिजचे ) डोंगर उभे रहात असल्याचे चित्र पहावयास मिळत आहेत. बेकायदेशीरपणे टाकण्यात येत असलेला कचरा (डेब्रिज) नागरिकांच्या आरोग्यास हानिकारक आणि प्रदुषणास कारणीभूत ठरत आहे. नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

त्यात काही कचरा ( डेब्रिज) माफीये राजरोसपणे हजारो टन कचरा (डेब्रिज) हा वहाल ग्रामपंचायत हद्दीतील खाडीकिनाऱ्यावरील खारफुटींवर तसेच खाडीच्या पाण्यात टाकत असल्याने खारफुटीची वने नष्ट होऊन खाडीतील विविध जातींचे मासे संपुष्टात येऊ लागले आहेत.

त्यामुळे प्रदुषणात वाढ होऊन मासेमारी करणाऱ्या बांधवांचे उपजिविकेचे साधन संपुष्टात येऊ लागले आहे. यासंदर्भात शासनस्तरावरून कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नसल्याने त्याचा फायदा उठवत आत्ता तर हा कचरा( डेब्रिज) चक्क गव्हाण फाटा –दिघोडे या रहिवाशांच्या रहदारीच्या रस्त्यावरील साईट पट्टीवर रात्री अपरात्री टाकला जात आहे.

त्यामुळे रस्त्यावरील पाणी जाणारी स्त्रोत बुजविले जात आहेत.यामुळे या मार्गांवरून मार्गक्रमण करणाऱ्या वाहनांना अपघाताला सामोरे जावे लागत आहे.

यासंदर्भात अनेक वेळा तक्रार दाखल करुन आवाज उठविण्यात आला आहे. परंतु महसूल विभागाचे अधिकारी, पोलीस अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आणि सिडकोचे अधिकारी हे मी मारल्या सारखे करणार तू रडल्या सारखे कर या म्हणीप्रमाणे एकमेकांची पाठ राखण करीत आहेत.

त्यामुळे अशा कचऱ्याच्या ( डेब्रिजच्या) गंभीर समस्यांमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला तर तसेच रस्त्यावर अपघात झाला तर संबंधित प्रशासनाला जबाबदार धरुन कारवाई करावी अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

# विशेष संक्षिप्त पुर्नरीक्षण कार्यक्रमांतर्गत नवमतदार नोंदणी जनजागृतीकरिता अलिबाग येथे सायकल रॅली व वॉकेथॉन संपन्न



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र शासनाच्या निवडणूक विभागांतर्गत दि.९ नोव्हेंबर ते दि.८ डिसेंबर २०२२ या कालावधीत नवमतदार नोंदणी होण्याच्या दृष्टीने विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम-२०२३ अंतर्गत जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे यांच्या पुढाकारातून अलिबाग येथे सायकल रॅलीआणि वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले.

या रॅलीत उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे, जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक, नायब तहसिलदार (निवडणूक) राजश्री साळवी, प्रिझम सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा तपस्वी गोंधळी, जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी व नागरिक सहभागी झाले होते. या रॅलीच्या माध्यमातून नवमतदारांना मतदार नोंदणी करण्याविषयीचे आवाहन करण्यात आले. छायाचित्रासह मतदार यादी विशेष संक्षिप्त पु-नरीक्षण कार्यक्रमाच्या देशपातळीवरील शुभारंभाच्या निमित्ताने भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार आणि निवडणूक आयुक्त अनुपचंद्र पांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे येथे मतदार जनजागृती सायकल फेरीचा शुभारंभ करण्यात आला. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार म्हणाले, देशाच्या प्रत्येक भागातील प्रत्येक पात्र नागरिकांची मतदार म्हणून नोंदणी झाली पाहिजे. लोकशाही सशक्त करण्यासाठी मतदानही आवश्यक आहे. शहरी भागात मतदार नोंदणीचे प्रमाण कमी असल्याने त्याबाबत जागृती निर्माण करण्यासाठी मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाचा देशपातळीवरील शुभारंभ पुण्यातून होत आहे. देशातील दुर्गम भाग, वाळवंट, समुद्रकिनारा, दऱ्याखोऱ्यातील नागरिक मतदानात सहभाग घेतात हे आपले वैशिष्ट्य आहे.

यावेळी निवडणूक आयुक्त श्री.अनुपचंद्र पांडे म्हणाले, या वेळेचा मतदारयादी पुनरीक्षण कार्यक्रम युवा मतदार केंद्रीत ठेवण्यात आला आहे. या कार्यक्रमांतर्गत १७ वर्षाचा युवकही नोंदणी करू शकणार आहे. वयाची १८ वर्ष पूर्ण होताच त्याचा समावेश मतदारयादीत केला जाईल. लोकशाही सशक्त करण्यासाठी सर्वांनी मतदार नोंदणी करावी आणि सायकलच्या चाकाच्या गतीप्रमाणे मतदार जनजागृतीचा संदेश प्रत्येक भागात पोहोचवावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे म्हणाले, वयाची १७ वर्षे पूर्ण झालेल्या युवकांनी मतदार म्हणून नोंदणी करुन मतदान प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी होणे तसेच मतदारयादीचे शुद्धीकरण करणे या दुहेरी उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील प्रत्येक गावात दि.१० नोव्हेंबर रोजी विशेष ग्रामसभा आयोजित करुन मतदारयादीचे वाचन, नवीन मतदारांची नोंदणी करण्यात येणार आहे. प्रत्येक महाविद्यालयात मतदार नोंदणी शिबिराचेही आयोजन करण्यात येणार आहे.

# बालदिनाचे औचित्य साधून साहित्य संपदातर्फे नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

साहित्यक्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या साहित्यसंपदाचा चौथा वर्धापनदिन डोंबिवली येथील संवाद प्रबोधिनी संचालित संवाद कर्णबधिर प्रबोधिनी येथील कर्णबधिर आणि मूक बधिर मुलां समवेत साजरा होणार आहे. १४ नोव्हेंबर म्हणजे बालदिन, बालदिनाच्या निमित्ताने देशाच्या विविध भागांत कार्यक्रम पार पडत असतात. सामान्य बालकांसाठी हा दिवस म्हणजे विविध उपक्रमांची रेलचेल असते. मात्र अश्यावेळी विकलांग बालकांना मात्र तो आनंद उपभोगता येत नाही. त्यांच्या मनातील हीच खंत ओळखून बालदिनाचे औचित्य साधून साहित्यसंपदा तर्फे दिनांक १३ नोव्हेंबर २०२२, रविवार रोजी सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन आयोजन कर्ण बधिर मूकबधिर मुलांसाठी करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान जेष्ठ गझलकार ए के शेख भूषविणार असून ,जेष्ठ कवी लेखक गीतकार राजन लाखे अध्यक्ष मराठी साहित्य मंडळ ,डॉ.योगेश जोशी अध्यक्ष अक्षरमंच सामाजिक सांस्कृतिक प्रतिष्ठान ,अपर्णा आगाशे अध्यक्षा संवाद प्रबोधिनी आणि रायगडभूषण प्राप्त कवी स्तंभलेखक रमेश धनावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार असून महाराष्ट्रातील विविध भागातील साहित्यिक सदर कार्यक्रमास हजर राहून मुलांना साहित्याची मराठी ओळख करून देणार आहेत.

साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे ह्यांच्या संकल्पनेतून मुलांसाठी काव्यचित्र या विशेष अभिनव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. मुलांना काही निवडक बालकविता देण्यात येणार असून त्यांनी आपल्याला आवडलेल्या कवितेला चित्र स्वरूपात मांडणे अपेक्षित आहे. मुलांना मराठी भाषेची गोडी लागावी ,मराठी साहित्यात रुची निर्माण व्हावी आणि काव्यचित्राच्या माध्यमातून त्यांना साहित्य आणि कला ह्यांची सांगड घालता यावी या हेतूने स्पर्धा आयोजित केली जाणार आहे. साहित्य संपदा तर्फे सदर काव्यचित्रांचे प्रदर्शन सुद्धा भरविले जाणार असून डोंबिवली कल्याण ठाणे आणि इतर भागातील लोकांनी आवर्जून ह्याला भेट देऊन मुलांच्या सृजनशीलतेला प्रोत्साहन द्यावे अशी आशा काव्यचित्र स्पर्धा समन्वयक स्मिता हर्डीकर आणि जया पाटील ह्यांनी व्यक्त केली.

द्वितीय सत्रात मुलांना कविता चारोळी कथा अश्या विविध साहित्य प्रकारांची ओळख मुलांना सांकेतिक भाषेतून करून दिली जाणार आहे. मुलांना पुस्तक प्रकाशन सोहळा सुद्धा बालदिनाच्या पूर्वसंध्येला अनुभवता येणार आहे.

समीक्षक लेखक किरण बोरकर ह्यांच्या गोष्टी तुमच्या आमच्या कथासंग्रहाचे प्रकाशन राजेंद्र परब अध्यक्ष स्टार्ट गिविंग फाउंडेशन, ज्ञानामृत शिक्षण संस्थेचे संस्थापक किसन वराडे ह्यांच्या हस्ते पार पडणार आहे.निमंत्रितांचे अभिवाचन सुद्धा पार पडणार असून मुलांना कथांचे भावविश्व आपल्या शिक्षकांच्या साह्याने अनुभवता येणार आहे.

# जिल्ह्यातील २४० ग्रामपंचायतींची निवडणूक जाहीर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यातील विविध जिल्ह्यांतील ७ हजार ७५१ ग्रामपंचायतीच्या सदस्यपदासह थेट सरपंचपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दि.१८ डिसेंबर २०२२ रोजी मतदान होणार आहे. आजपासून आचारसंहिता लागू झाली असून, दि.२० डिसेंबर २०२२ रोजी मतमोजणी होईल, असे राज्य निवडणूक आयुक्त कार्यालयाने आज जाहीर केले आहे.

राज्य निवडणूक आयुक्त कार्यालयाने जाहीर केलेल्या ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम २०२२ चा तपशील पुढीलप्रमाणे:- ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित या सर्व ग्रामपंचायतीच्या निवडणुकांसाठी दि.१८ नोव्हेंबर २०२२ रोजी संबंधित तहसिलदार निवडणुकीची नोटीस प्रसिद्ध करतील.

नामनिर्देशनपत्र दि.२८ नोव्हेंबर २०२२ ते २ डिसेंबर २०२२ या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत दाखल करण्यात येतील. नामनिर्देशनपत्राची छाननी दि.५ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ११ वाजेपासून ते छाननी संपेपर्यंत होईल. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम मुदत दि.७ डिसेंबर २०२२ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत असेल व त्याच दिवशी निवडणूक चिन्हांचे वाटप होईल. मतदान दि.१८ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. मतमोजणी दि.२० डिसेंबर २०२२ रोजी होईल. निकालही त्याच दिवशी घोषित करण्यात येईल. जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत निवडणूकीच्या निकालाची अधिसूचना प्रसिद्ध करण्याचा अंतिम दि.२३ डिसेंबर २०२२ पर्यंत आहे.

रायगड जिल्ह्यातील २४० ग्रामपंचायतीच्या निवडणुका होणार आहेत. यामध्ये अलिबाग तालुक्यातील ६, मुरुड तालुक्यातील ५, पेण तालुक्यातील २६, पनवेल तालुक्यातील १०, उरण तालुक्यातील १८, कर्जत तालुक्यातील ७, खालापूर तालुक्यातील १४, रोहा तालुक्यातील ५, सुधागड तालुक्यातील १४, माणगाव तालुक्यातील १९, तळा तालुक्यातील १, महाड तालुक्यातील ७३, पोलादपूर तालुक्यातील १६, म्हसळा तालुक्यातील १३, श्रीवर्धन तालुक्यातील १३ ग्रामपंचायतींचा समावेश आहे. या निवडणुका दि.१८ डिसेंबर २०२२ रोजी होणार असून त्याचा निकाल दि.२० डिसेंबर २०२२ रोजी जाहीर केला जाईल, अशी माहिती उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के-पाटील यांनी दिली आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## आजही कामोठ्यातील घरांमध्ये दि.बा.पाटील साहेबांचे फोटो देव्हाऱ्यात आहेत

येथे होणारे वेगवेगळे प्रकल्प यामुळे या भागात उद्योगधंदा मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. येथील स्थानिक जनतेशिवाय विदर्भ, मराठवाडा तसेच संपूर्ण महाराष्ट्रातून नागरिक येऊन येथे राहत आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील तरुण जेएनपीटी येथे वेगवेगळ्या पदांवर कार्यरत आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील विविध पतसंस्था कमोठ्यात पाहायला मिळतात. येथे असलेल्या रेल्वे स्टेशनमुळे मुंबईला जोडणे सहज शक्य होते. येथील प्रत्येक नागरिकांची केंद्र आणि राज्य सरकारकडून अपेक्षा आहे. आपल्यावतीने त्याची पूर्तता होईल याची खात्री आहे. तुमच्या माध्यमातून विकासाचा रथ चालत रहावा अशी अपेक्षा आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी व्यक्त केली.

## ...तर अमेटी व्यवस्थापनाला देणार जोरदार दणका

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना बैठक घ्यायला सांगतो व हा प्रश्न आपण येत्या हिवाळी अधिवेशनात विधानसभेत मांडणार असल्याचे सांगताच त्यांनी या महिन्याच्या ३० तारखे पर्यंत निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. आमदार महेश बालदी यांनी ३० नोव्हेंबर पर्यंत प्रश्न मार्गी न लागल्यास भव्य स्वरूपात आंदोलन करण्याचा इशारा अमेटी युनिव्हर्सिटी प्रशासनाला यावेळी दिला.

## मानवी साखळी आंदोलन करीत पत्रकारांनी वेधले शासनाचे लक्ष

यावे यामागणीसाठी रायगड जिल्ह्यातील पत्रकारांनी मुंबई गोवा महामार्गावर मानवी साखळी आंदोलन केले. रायगड मधिल पत्रकारांसह समाजसेवि संस्था आणि नागरिकांनी यावेळी मोठया संख्येने या आंदोलनात सहभाग घेतला. सकाळी दहा वाजल्यापासूनच कोलाड नाक्यावर जिल्ह्यातिल पत्रकार जमू लागले होते. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार एस एम देशमुख यांच्या सह मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, माजी अध्यक्ष गजानन नाईक, माजी कोषाध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष भारत रांजणकर, जिल्हा पत्रकार संघाचे नागेश कुलकर्णी, माजी अध्यक्ष अभय आपटे, विजय मोकल, अनिल भोळे आदी उपस्थित होते. तर आमदार अनिकेत तटकरे, शिवसेना रोहा तालुका प्रमुख समीर शेडगे, रोहा सिटीझन फोरमचे अध्यक्ष नितीन परब, आप्पा देशमुख आदींसह विविध सामाजिक संघटनांनी यावेळी उपस्थित राहून आंदोलनात आपला पाठिंबा दिला. सकाळी ११ वाजेपर्यंत मोठ्या संख्येने पत्रकार व नागरिक आंदोलन स्थळी जमा झाले. यावेळी पोलिसांची मोठी कुमक बोलावण्यात आली होती. साडेअकरा वाजता महामार्गावर मानवी साखळी करण्यात आली. अर्ध्या तासाने महामार्गाचे प्रकल्प संचालक यशवंत व्होटकर हे रोहा तहसीलदार कविता जाधव यांच्यासमवेत आंदोलनस्थळी आले, चौपदरीकरणाचे कामाबाबत अधिकाऱ्यांनी माहिती दिली, येत्या एक महिन्यात रस्ता सुस्थितीत करण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले. मात्र त्यांच्याकडून समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने याविषयावर बैठक घेण्याचे ठरले. तसेच पुढील एक महिन्यात महामार्ग दुरुस्त करण्याचे अलटीमेटम यावेळी अधिकाऱ्यांना देण्यात आले. मागण्यांचे निवेदन दिल्यानंतर या आंदोलनाची सांगता झाली.

# सामान्य नागरिकांसाठी क्रीडांगण विकसित करण्याची मंगेश रानवडे यांची आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर वसाहत परिसरात सामान्य नागरिकांसाठी क्रीडांगण विकसित करण्याची शिंदे गटाचे महानगर संघटक मंगेश रानवडे यांची आयुक्त गणेश देशमुख यांच्या कडे निवेदना मार्फत मागणी करण्यात आली आहे .

आयुक्त गणेश देशमुख यांची शिंदे गटाचे संपर्कप्रमुख रामदास शेवाळे,महानगर संघटक मंगेश रानवडे , खारघर शहर संघटक इम्तियाज शेख, मुनाफ अमिराली, झोयेब शेख आदींनी भेट घेतली त्यावेळी महानगर संघटक मंगेश रानवडे यांनी सांगितले की , खारघर सेक्टर ३५ एच मधील प्लॉट नंबर एक, सिडकोच्या मास्टर प्लॅन प्रमाणे, ओपन स्पेस व खेळण्याकरिता आरक्षित घोषित केला गेला आहे.नुकताच हा प्लॉट सिडकोने पनवेल महानगरपालिका प्रशासनाला हस्तांतरितही केला गेला आहे.ह्याच पार्श्वभूमीवर, आपल्याला व आपल्या मुलांना खेळण्याकरिता तथा विरंगुळा मिळण्याठी एक उत्तम क्रीडांगण मिळेल या आशेने नागरिकांनी या प्लॉट सभोवताली वसलेल्या अनेक ग्रह संकुलामध्ये सदनिका विकत घेतल्या.मात्र जेव्हा -जेव्हा नागरिक अथवा लहान मुले इकडे खेळण्याचा प्रयत्न करीत आहेत तेव्हा-तेव्हा स्थानिक मंडळी त्यांना शिवीगाळ करून, दमदाटी करून, खेळण्यासाठी वापरण्यास मज्जाव करत असल्याने, नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. इतकेच थांबले नाही तर पनवेल महानगरपालिकांनी लावलेला आपल्या मालकी हक्काचा बोर्ड ही ह्या प्लॉट वरून रातोरात गायब केला गेला आहे या गोष्टीची गंभीर दखल घेत शिंदे गटाचे, खारघर शहर संघटक इम्तियाज शेख यांनी महानगर संघटक क्षेत्र पनवेल मंगेश रानवडे यांच्या निदर्शनास ही बाब आणली. खारघर सेक्टर ३५ च्या नजीकच्या परिसरात सिडकोने आंतरराष्ट्रीय पातळीचे, फुटबॉल व हॉकी क्रीडांगण विकसित जरी केले असले तरी सामान्य नागरिकांसाठी एकही क्रीडांगण विकसित न केल्याने, येथील परिसरात राहणारे रहिवासी अत्यंत नाराज आहेत. बाळासाहेबांची शिवसेना, या पक्षाचे संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांना याबाबत पूर्ण माहिती व सखोल चर्चाही केली. या चर्चा बैठक मध्ये मंगेश रानडे व इम्तियाज शेख, मुनाफ अमिराली, झोयेब शेख उपस्थित होते.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरे लावण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील आष्टे तलाव, अरीवली तलाव आणि मध्ये रस्त्यावर आष्टे ते अरीवली येथे बिबट्याची दहशत कायम आहे. त्यामुळे या बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरे लावण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

पनवेल तालुक्यातील आष्टे, अरीवली गावामध्ये बिबट्या मुक्त संचार करत आहे. त्यामुळे गावकरी भीतीच्या वाता–वरणात वावरत आहेत. रात्रीच्या वेळी बाहेर न पडण्याचे आवाहन वनविभाग करत आहे. त्या दृष्टीने वनविभागाने बॅनरबाजी देखील केली आहे मात्र या बिबट्याच्या भीतीमुळे नागरिकांना घराच्या बाहेर पडणे असह्य झाले आहे. रात्रीच्या वेळेस घराबाहेर पडता येत नसल्याने या बिबट्याला वनविभागाने लवकरात लवकर जेरबंद करावे अशी मागणी जोर धरू लागली आहे. ठिकठिकाणी बिबट्याचे ठसे दिसू लागल्याने लहान मुलांना घराच्या बाहेर पाठवता येत नाही. वन विभागाने या बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरे लावावेत अशी मागणी नागरिक करत आहेत.

## खरसई, मेंदडी, पांगलोली येथे कायदेविषयक जनजागृती शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा पोलीस स्टेशन हद्दींत एकाच दिवसात खरसई, मेंदडी, आणि पांगळोली या तीन मोठया लोकसंख्येच्या गावांमध्ये जिल्हा न्याय विधी सेवा प्राधिकरण रायगड आणि म्हसळा पोलीसांमार्फत कायदेविषयक जनजागृती शिबीर संपन्न झाले. यावेळी श्रीवर्धन न्यायालयातील अँड .स्वानंद दातार,अँड. मुकेश पाटील,अँड. मंदार ठोसर अँड.शेख, अँड. चांदोरकर यांनी उपस्थित राहून कायदेविषयक जनजागृती उपक्रमांतर्गत बालकांचे हक्क, शिक्षणाचा अधिकार, बेटी बचाओ–बेटी पढाओ तसेच लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा, बालकांवरील अत्याचार, बालकांचे मूलभूत हक्क आणि शिक्षणाचा अधिकार या विषयांवर शालेय विद्यार्थ्यांना माहिती दिली.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# आता होणार वर्षातून चार वेळा मतदार नोंदणी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

आतापर्यंत मतदार नोंदणीसाठी दि.१ जानेवारी हा अर्हता दिनांक असायचा, म्हणजे दि.१ जानेवारी किंवा त्या आधी वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या नागरिकांना मतदार नोंदणी करता यायची. मात्र २०२३ पासून जानेवारी, एप्रिल, जुलै आणि ऑक्टोबर या महिन्याच्या १ तारखेला किंवा त्याआधी ज्या नागरिकांची १८ वर्षे पूर्ण होतील, त्यांना दि.९ नोव्हेंबर ते ८ डिसेंबर २०२२ या विशेष मोहिमेंतर्गत आगाऊ मतदार नोंदणी करता येणार आहे.

निवडणुका पारदर्शक आणि न्याय्य वा–तावरणात पार पाडण्यासाठी मतदारयाद्यांचे अद्ययावतीकरण अत्यंत महत्त्वपूर्ण असते. दि.९ नोव्हेंबर रोजी मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर आणि मतदार नोंदणी कार्यालयामध्ये प्रारूप यादी प्रकाशित केली जाईल. मतदारांनी आपले नाव, पत्ता, लिंग, जन्मदिनांक, वय, ओळखपत्र क्रमांक, मतदारसंघ इ. तपशील मतदार यादीत तपासून ते अचूक आहेत का याची खात्री करणे आवश्यक आहे. बरेचदा ऐन मतदानाच्या दिवशी आपले नाव मतदार यादीत नाही, अशी तक्रार अनेक मतदाराकडून केली जाते. त्यामुळे मतदारांनी प्रारूप मतदार यादीतील आपले तपशील आत्ताच तपासणे महत्त्वाचे आहे.

दि.९ नोव्हेंबर ते ८ डिसेंबर २०२२ हा कालावधी मतदार नोंदणीचा आहे, तसा तो




एखाद्याच्या नावासंबंधी हरकती घेण्याचाही आहे. एखाद्या मतदारसंघातील एखादा मतदार यादीत दिलेल्या पत्त्यावर राहत नसेल, तर अशा नावाबद्दल त्याच मतदारसंघातील अन्य मतदार आक्षेप घेऊ शकतो. त्यामध्ये जर तथ्य आढळून आले तर पडताळणी करून संबधित मतदाराच्या नावाची वगळणी केली जाते. मतदारयाद्यांचे अद्ययावतीकरण होण्यासाठी अशा अपात्र मतदारांची वगळणीही महत्त्वाची असते.

यंदाच्या विशेष पुनरीक्षण कार्यक्रमाच्या निमित्ताने दि.१९ व २० नोव्हेंबर आणि दि.३ व ४ डिसेंबर या दिवशी राज्यभर विशेष शिबिराचे आयोजन केले जाणार आहे. तसेच वंचित घटकांसाठी खास शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. महिला आणि दिव्यांग याच्या नाव नोंदणीसाठी दि.१२ व १३ नोव्हेंबर रोजी, तर दि.२६ व २७ नोव्हेंबर रोजी तृतीयपंथी नागरिक, देह व्यवसाय करणाऱ्या महिला आणि घर नसलेले भटक्या व विमुक्त जमातीचे नागरिक याच्या नाव नोंदणीसाठी राज्यभर विशेष शिबिरे घेतली जा–तील. तसेच तरुण मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, नेहरू युवा केंद्र संघटन, भारत स्काऊट यांच्या सहकार्याने राज्यभर मतदार नोंदणीची शिबिरे राबवण्यात येणार आहेत. शिवाय, मतदार नोंदणी, नाव वगळणी, तपशिलातील दुरुस्त्या या सुविधा NVSP, Voter Portal या संकेतस्थळावर आणि Voter Helpline या ॲपवर उपलब्ध आहेत. ग्राम विकास व पंचायतराज विभागाच्या सहकार्याने दि.१० नोव्हेंबर रोजी राज्यभर विशेष ग्रामसभेचे आयोजन केले जाणार आहे. या दिवशी राज्यभरातील ग्रामसभामध्ये मतदारयादीचे वाचन केले जाईल. त्यांतर्गत नव्याने नाव नोंदणीस पात्र नागरिक, लग्न होऊन गावात आलेल्या स्त्रिया, गावात कायमस्वरूपी नव्याने वास्तव्यास आलेले नागरिक याची नाव नोंदणी केली जाईल. तसेच दुबार नावे, मृत व्यक्ती, गावातून कायमस्वरूपी स्थलांतरित झालेल्या व्यक्ती, लग्न होऊन अन्य गावात गेलेल्या स्त्रिया याच्या नावाची मतदार यादीतून वगळणी केली जाईल.

मतदार नोंदणीसाठी पात्र युवांनी मतदारयादीत आपले नाव नोंदवावे, तसेच प्रत्येक मतदाराने प्रारूप मतदारयादीतील आपले तपशील अचूक आहेत का याची खात्री करून घ्यावी, असे आ–वाहन मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी केले आहे.

## मुरुडमध्ये राष्ट्रवादी कॉँग्रेसतर्फे अब्दुल सत्तार यांचा निषेध



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

राज्याचे कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खा. सुप्रिया सुळे यांच्याबद्दल बोलत असताना शिवीगाळ केल्याने राष्ट्रवादी आक्रमक झाली असून जिल्ह्यात ठिकठिकाणी त्यांच्या बेताल वक्तव्याचा निषेध करण्यात आला.मुरुडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे अब्दुल सत्तार यांचा जाहीर निषेध करण्यात आला.यावेळी तालुका अध्यक्ष मंगेश दांडेकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत मुरुड पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक यांना एक निवेदन देण्यात येऊन खासदार सुप्रियाताई सुळे यांच्याबद्दल कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी खालच्या पातळीवर जाऊन विधान केल्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करणेबाबत मागणी करण्यात आली.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, महाराष्ट्र राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी संसदरत्न खासदार सुप्रियाताई सुळे, यांच्याबद्दल खालच्या पातळीवर जावुन बेताल वक्तव्य केले. त्यांच्या या वक्तव्याचा मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने निषेध व्यक्त करीत आहोत. कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी बेताल वक्तव्य केले म्हणुन पोलिस स्टेशन यांनी त्यांच्यावर तात्काळ अटकेती योग्य ती कारवाई करावी.अशी मागणी दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष मंगेश दांडेकर, तालुका महिला अध्यक्षा अँड. मृणाल खोत, शहर अध्यक्ष विजय भोय, महिला शहर अध्यक्ष प्रमिला माळी, तालुका सरचिटणीस विजय पैर, माजी नगरसेवक बाबा दांडेकर, युवक अध्यक्ष मनीष माळी, मोहीद्दीन शेख तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## सुधागड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे ना. अब्दुल सत्तारांचा जाहीर निषेध

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

शिंदे–भाजप सरकार मधील मंत्री वादग्रस्त विधानामुळे वारंवार अडचणीत येत आहेत. राज्याचे कृषिमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या संसदरत्न खा. सुप्रिया सुळे यांच्याबद्दल बोलत असताना शिवीगाळ केल्याने राष्ट्रवादी आक्रमक झाली आहे. सुधागड तालुक्यातील पाली तहसिल कार्यालयापर्यंत रॅली काढून कार्यकर्त्यांनी अब्दुल सत्तार यांच्या विरोधात घोषणाबाजी केली. व मागणीचे निवेदन पाली तहसीलदार उत्तम कुंभार यांना दिले. ना. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यांची दखल घ्यावी व योग्य ती कारवाई करावी. तसेच ना. अब्दुल सत्तार यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे करण्यात आली. कृषिमंत्री ना. अब्दुल सत्तार यांची जीभ घसरली. व त्यांनी सुप्रिया सुळे यांच्याबाबत केलेले विधान अंगलट येईल अशी परिस्थिती सर्वत्र निर्माण झाली. त्यांनी जे वादग्रस्त व महिलांचा अवमान करणारे विधान केले त्याविरोधात राष्ट्रवादी सह जनमानसातून संताप व्यक्त होतोय. याचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्र राज्यात उमटले. संपूर्ण राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्यांनी ना. सत्तारांच्या विधानावर संताप व्यक्त करीत प्रतिकात्मक पुतळ्याला जोडे मारून दहन केले. पालीत देखील ५० खोके एकदम ओके अशा घोषणा देत ना. सत्तार यांनी केलेल्या आक्षेपार्ह विधानाचा जाहीर निषेध केला.


यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक अध्यक्ष संदेश शेवाळे म्हणाले की राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया ताई सुळे या आपल्या सुस्वभावाने व कर्तृत्वाने सर्वांच्या मनात घर करून आहेत. समाजकारण व राजकारणात पवार कुटुंबीय सर्वांच्या आदर व प्रेरणास्थानी राहिले आहे. आदर्श व सुसंस्कृत राजकारणाचे धडे सुप्रियाताई यांच्याकडून युवक व युवती घेत आहेत. त्यामुळे अब्दुल सत्तार सारखी माणसे वायफळ बडबडत आहेत, सत्तेची नशा डोक्यात गेल्याने त्यांच्याकडून होणारी विधाने निषेधार्ह आहेत. सत्तार यांनी महिलांचा अवमान व सन्मानाला ठेच पोहचवणारे विधाने केले आहे, त्यांनी सुप्रियाताई सुळे व समस्त महिला भगिनींची माफी मागावी , व राज्य सरकारने त्यांचा राजीनामा तात्काळ घ्यावा, अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष त्यांना कुठेही फिरू देणार नाही व यापेक्षाही उग्र आंदोलन केले जाईल असा इशारा शेवाळे यांनी दिलाय.

# कोकण रेल्वे मडगांव स्पेशल ट्रेन खाली रान गव्याचा दुर्दैवी मृत्यू

### ट्रेन अपघाती मृत गव्याला अक्षरशः कापून ट्रेनच्या बफर जॉइंण्ट मधून बाहेर काढले

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

मंगळवार दि. ८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ०६ .०० वाजताचे सुमारास संगमेश्वर स्टेशन वरून चिपळूण च्या दिशेने जाणाऱ्या कोकण रेल्वेला अपघात झाला आहे. संगमेश्वर आणि कडवई रेल्वे ट्रॅक वर पोल नंबर १६७/१४ ट्रेन नंबर ११९०० मडगांव एलटीटी डबल डेकर स्पेशलच्या समोर ट्रॅकवर रान गवां आडवा येऊन अपघात झाला. बोगद्याच्या अलिकडे हा अर्धगोलाकार शिंग तोंडावर केस असलेला मोठा गवा गाडीच्या समोर आडवा आला आणि इंजिनमध्ये अडकल्याने तो दुर्दैवी मृत्युमुखी पडला.



अपघाती सापडलेला हा गवा ट्रेनच्या बफर जॉइंण्ट मध्ये अडकला तो मोटरमनला दिसत नव्हता, एखाद वेळेस तो निघुन गेला असेल असे मोटरमनला वाटले मात्र ट्रॅकवरील खडी उडत आवाज येत असल्याचे लक्षात आल्याने ब्रेक लावुन ट्रेन थांबविण्यात आली. बोगद्या पलिकडे जवळपास पाचशे मिटर त्याला फरफटत नेले. या ट्रेनचे १७ ही डब्बे प्रवास्यांनी गच्च भरलेले होते परंतु सुदैवाने धोका टळला. ट्रेन मधिल प्रवासी, मोटरमन आणि गार्डच्या मोठ्या मेहन–तीने या मृत गव्याला बाजुला काढण्यात यश आल्यानंतर ०७.२० वाजता ट्रेन येथुन पुन्हा सुखरुप मार्गस्थ झाली.

निर्मनुष्य ठिकाणी हा अपघात झाल्याने ट्रेन काळोखात थांबली शेवटचा १७ वा डबा बो–गद्यात राहिल्यामुळे टॉर्च लाईट इथपर्यंत पोह–ोचतच नव्हती अश्या बिकट अवस्थेत पाठच्या डब्यातील प्रवाश्यांना गाडी का थांबली? काहीच कळेनासे झाले. या ठिकाणी ट्रेन मधिल प्रत्यक्षदर्शी प्रवासी मंगेश निगडे व केतन वारुगसे यांनी ही सर्व घटना रायगड जिल्ह्यातील पत्रकार मित्र रविंद्र कुवेसकर यांच्याजवळ संपर्क करुन सांगितली कारण येथुन कोणाची मदत मिळणार असा प्रश्न त्यांना पडला होता, रेल्वे प्रशासनाचा हेल्पलाईन नंबर मिळेल का अशी विनंती आमचे जवळ केली असता पत्रकार कुवेसकर यांनी लगेचच माणगांव पोलीसांना सदरची घटना सांगितली.

माणगांवचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेंद्र पाटील यांनी रत्नागिरी कंट्रोल पोलीसांचा नंबर दिला त्यावर मंगेश निगडे यांनी संपर्क करताच कंट्रोल पोलीसांनी संबंधितांना कळवलं, ट्रेनच्या मोटरमन आणि गार्ड नेही संपर्क करुन तस कळवलं होत, कडवई रेल्वे स्टेशनचे स्टेशन इंन्चार्ज व ४ जणांचा स्टाफ, २० ते २५ मिनिटातच ट्रॅक वरून पायी चालत येथे पोहोचले.

विशेष म्हणजे याच ट्रेन मधिल प्रवासी १४ वर्षाच्या दीप मंगेश निगडे हा मुलगा, मोटरमन आणि गार्ड यांना काळोखात टॉर्च दाखवून सहकार्य करीत होता तर ट्रेन मधिलच प्रवासी आकाश अशोक दळवी यांनी नाईलाजास्तव त्या मृत गव्याला अक्षरशहा कापूनच ट्रेनच्या बफर जॉइंण्ट मधून बाहेर काढले. सव्वातासाच्या कठीण प्रयासाने हे अवघड ऑपरेशन पूर्ण केलं गेलं. या कामी सर्वांचे सहकार्य उत्तम रित्या लाभल्याने गाडीतील प्रवास्यांना हायसे वाटले व अखेर ट्रेन ०७.२० वाजता येथुन मार्गस्थ झाली आहे. याबद्दल कोकण रेल्वे आणि पोलीस तसेच पत्रकार मित्राचे रेल्वे प्रवास्यांनी आभार व्यक्त केले आहेत.

## जिल्ह्यात दि.१२ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार रायगड जिल्ह्यामध्ये दि.१२ नोव्हेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे, असे न्यायाधीश तथा सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड–अलिबाग श्री.अमोल शिंदे यांनी कळविले आहे. या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये न्यायालयात प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे, मोटार आपघात प्रकरणे, १३८ एन.आय ॲक्ट खालील प्रकरणे, दिवाणी अपिले, तडजोडपात्र पालिका व ग्रामपंचायत यांच्या घरपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर यांच्याडिल थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या लोकअदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत. राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये प्रकरणे तडजोडीने निकाली केल्यास लोकांचा पैसा आणि वेळ यांचा अपव्यय होत नाही, पक्षकारांना तात्काळ न्याय मिळतो. न्यायालयात भरलेली कोर्ट फीस परत मिळते. त्यामुळे दि.१२ नोव्हेंबर २०२२ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे. तरी या लोकअदालतीचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा, असे आ–वाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड–अलिबाग श्रीमती एस.एस.सांवत यांनी केले आहे.

## सार्वजनिक रस्त्यावरील रहदारीस अडथळा निर्माण करून वाहनांची दुरुस्ती कणाऱ्या दोन गॅरेजचालकांविरोधात खारघर पोलिसांची कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सार्वजनिक रस्त्यावरील रहदारीस अडथळा निर्माण करून वाहनांची दुरुस्ती कणाऱ्या दोन गॅरेजचालकांविरोधात खारघर पोलिसांनी कारवाई करून त्यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत. हे दोन्ही गॅरेजचालक विनापरवाना वाहनदुरुस्ती करत होते. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या रस्त्यावरून वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याचा आरोप त्यांच्यावर आहे.

खारघरमध्ये काही गॅरेजचालक मालक हे रस्त्यावर बेकायदा वाहने पार्किंग करून वाहनांची दुरुस्ती करत असल्यामुळे इतर वाहनांना त्याचा अडथळा निर्माण होत होता. अनेक तक्रारी परिसरातील नागरिकांकडून करण्यात आल्या होत्या. या तक्रारींची दखल घेऊन खारघर पोलिसांनी खारघर, सेक्टर–३, बेलपाडा येथील गॅरेज लाईनमध्ये जाऊन पाहणी केली.

या वेळी खारघरहून सीबीडीकडे जाणाऱ्या रोडवर वैदश्री सोसायटीतील कार मार्टसमोर इंद्रजीत राजेंद्र सजोज (वय २०) हा मॅकेनिक रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस धोका व अडथळा निर्माण होईल, अशा पद्धतीने वाहन पार्क करून त्याची दुरुस्ती करताना आढळून आला. त्याच्याकडे परवाना नसल्याचे आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला. त्यानंतर अंबाजी सदन सोसायटीतील एम. के. मोटर्स समोर रकीब माजुद खान (वय ३२) हा मॅकेनिकदेखील त्याच पद्धतीने गॅरेज चालवताना आढळून आला.

## इजिप्शियन सोनेरी गिधाडांना फणसाडच्या व्हल्चर रेस्टॉरंटची भुरळ

**दै.रायगड नगरी । मुरुड**

सध्या हिवाळ्याला सुरुवात झाल्याने वातावरणातील थंडी हळूहळू वाढत आहे. या गुलाबी थंडीत मुरुड तालुक्यातील प्रसिद्ध फणसाड अभयारण्यामध्ये असलेल्या एका खास रेस्टॉरंटची भुरळ परदेशी इजिप्शियन सोनेरी गिधाडांना पडली असून तेथील खाद्याचा आस्वाद घेण्यासाठी हे इजिप्शियन पाहुणे सध्या दर विकेंडला फणसाडमध्ये येत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

परदेशी पाहुणे आहेत 'इजिप्शियन गिधाडे' अन् फणसाड अभयारण्यात खास गिधाडांसाठी तयार करण्यात आलेले 'व्हल्चर रेस्टॉरंट हे ते या पाहुण्यांना आवडलेले रेस्टॉरंट आहे. वनखात्याने पर्यावरणाच्या रक्षणासाठी अत्यावश्यक असलेल्या परंतु अलीकडे नष्ट होत चाललेल्या या परिसरातील गिधाडांच्या रक्षण तथा संवर्धनासाठी गेल्या वर्षी सुपेगाव परिसरातील फणसाड वन्यजीव संरक्षक अभयारण्यात 'व्हल्चर रेस्टॉरंट' उभारले आहे.

या रेस्टॉरंटमध्ये येथील वनाधिकारी व वनरक्षक मुरुड तालुक्यासह अन्य परिसरातील मृत जनावरांना आणून टाकतात. कुजके, सड़के मांस हे गिधाडांचे प्रमुख खाद्यान्न आहे. ते येथे गिधाडांना पुरवले जाते. ते खाण्यासाठी या परिसरातील गिधाडे तर येत आहेतच,



परंतु आता त्यात या परदेशी पर्यटकांची भर पडली आहे. शुक्रवारी व शनिवारी संध्याकाळीवनखात्याने तयार केलेल्या या रेस्टॉरंटमध्ये दोन दिवसांपूर्वी टाकलेल्या एका मृत म्हशीचे मांस भक्षण करण्यासाठी ही इजिप्शियनसोनेरी रंगाची, काळ्या मानेची गिधाडे वनाधिकाऱ्यांना दिसून आली. त्यामुळे दर विकेंडला ती या रेस्टॉरंटला भेट देत असावीत यावर त्यांचे शिक्कामोर्तब झाले.

फणसाड अभयारण्याचे सहाय्यक वनसंरक्षक नंदकिशोर कुप्ते यांनी त्यास दुजोरा दिला आहे. पर्यावरणाचा समतोल बासळल्यामुळे शेती करणे शेतकऱ्यांना परवडत नसल्याने बऱ्याच शेतकऱ्यांनी शेती ओसाड टाकली आहेत. पर्यायाने शेतीसाठी आवश्यक गुरा–ढोरांची संख्या कमी झाल्याने गिधाडांचे खायच नामशेष होऊन त्यांच्या संख्येवर परिणाम झाला असून त्यांचे संरक्षण करणे आवश्यक झाले आहे. फणसाड अभयारण्यातील वनसंपदा व पशुपक्ष्यांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी अनेक सामाजिक संस्था मदत करीत असून ग्रीन वर्क ट्रस्ट ही एक संस्था देखील गिधाड प्रजातीच्या रक्षण व संवर्धनासाठी येथे काम करीत आहे. त्यामुळे येथे नष्ट होत चाललेल्या गिधाडांच्या संख्येत वाढ होत आहे. आता तर परदेशी गिधाडे ही फणसाडमध्ये घिरट्या घालू लागली आहेत.

## तीन पानशॉपवर टाकलेल्या छाप्यात गुटखा व पानमसाल्याचा साठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील कळंबोली खिडुकपाडा येथील तीन पानशॉपवर टाकलेल्या छाप्यात मोठ्या प्रमाणात गुटखा व पानमसाल्याचा साठा हस्तगत करण्यात आला आहे .

पेण येथील अन्न व औषध प्रशासन विभागातील सहाय्यक आयुक्त (अन्न) ल. अं. दराडे, अन्न सुरक्षा अधिकारी वि. वि. शिंदे व स. रा. आढाव व त्यांच्या पथकाने कळंबोली खिडुकपाडा येथील तीन पानशॉपवर छापे मारले. यात रामदुलारे प्रजापती पानशॉप, श्रीराम जेस्वाल पानशॉप, आणि खजांची प्रसाद गौड पानशॉप या तीन पानशॉपचा समावेश होता. येथे त्यांना गुटखा व पानमसाल्याचा साठा आढळून आला. त्यावर त्यांनी हा साठा जप्त करून त्यांचे शॉप सील करत रामदुलारे प्रजापती (२८), श्रीराम जेस्वाल (४९) आणि खजांची प्रसाद गौड (४८) या तिघांना ताब्यात घेतले आहे .